# १७ उद्योग (Industry)

- अर्थव्यवस्थेचे द्वितीय क्षेत्र - उद्योग क्षेत्र म्हणुन ओळखले जाते.
- i) कारखानदारी, ii) बांधकाम, iii) वायु, पाणी, वीज.

**उद्योगांचे वर्गीकरण**

| मालकीच्या आधारावर | उत्पादनाच्या स्तराच्या आधारे | वापराच्या आधारावर |
|---|---|---|
| सार्वजनिक | सुक्ष्म उपक्रम | मुलभूत वस्तू उद्योग |
| खाजगी | लघु | भांडवली वस्तू |
| संयुक्त | मध्यम | पुर्ननिर्माण वस्तू |
| सहकारी | मोठे | उपभोग्य वस्तू |

## IIP - Index of Industrial Production
## औद्योगिक वाढीचा निर्देशांक

- IIP औद्योगिक उत्पादनातील वाढ दर्शवणारा निर्देशांक होय.
- IIP हा एक अल्पकालीन / मासिक वृद्धी दर्शवणारा निर्देशांक होय.
- निर्देशांक काढताना - 100 असे समजुन काढला जातो. (आधार वर्षातील मुल्य)
- CSO - मार्फत हा निर्देशांक काढला जातो.
- 12 मे, 2017 पासुन IIP निर्देशांकाचे आधार वर्ष बदलले आहे. नविन आधारवर्ष 2011-12 हे आहे यापुर्वी 2004-05 हे होते.

आतापर्यंत वापरलेले आधारवर्षे :- 1946-47, 1951-52, 1956-57, 1960-61, 1970-71, 1980-81, 1993-94, 2004-05, **2011-12 (12 मे, 2017 पासुन)**

- 2004-05 च्या आधार वर्षानुसार IIP मध्ये एकुण 682 वस्तु समाविष्ट होत्या. त्यापैकी

| | वस्तुगट | वस्तुसंख्या | भार |
|---|---|---|---|
| 1. | खनिज | 61 | 14.16 |
| 2. | उत्पादन | 620 | 73.53 |
| 3. | विज | 01 | 10% |
| | **एकुण** | **682** | |

☞ IIP काढताना 3 घटकांचा समावेश होतो.

- खनिज
- विज
- उत्पादित वस्तु
  1) मुलभूत वस्तु
  2) भांडवली वस्तु
  3) संक्रमित वस्तु
  4) ग्राहक वस्तु

☞ नविन बदल 2011-12 च्या श्रृखंलेनुसार - IIP मध्ये 407 वस्तु समाविष्ट होतात.

**2011-12 नुसार**

| | क्षेत्र | वस्तुसंख्या |
|---|---|---|
| 1. | खनिज उत्पादन | 01 |
| 2. | उत्पादित वस्तु | 405 |
| 3. | विज निर्मिती | 01 |
| | **एकुण** | **407** |

**2014-15 नुसार**

| भार | वस्तुसंख्या | भार |
|---|---|---|
| 14.37 | 01 | 14.15 |
| 77.63 | 397 | 75.52 |
| 7.99 | 01 | 10.31 |
| **100%** | **399** | **100** |

☞ IIP निर्देशांक काढताना 14 कंपन्यांचा समावेश होतो.

## भारतात उद्योगाचा विकास :-

☛ जयशेटजी टाटांनी 1877 - औद्योगिकरणास सुरुवात. मुंबईत स्पिनिंग उद्योग.

☛ 1907 - दोराबाजी टाटा (Tisco Tata Iron & Steel Company Limited)

☛ 1854 - मुंबईत पहिली कापड गिरणी.

☛ स्वातंत्र्यापूर्वी आद्योगिक धोरण 1916 - ब्रिटीश.
1917 - भारतीय युद्ध साहित्य महामंडळ स्थापन.
1922 - भारतीय वित्त आयोगाची स्थापना.

## 1) पहिले औद्योगकि धोरण - 8 एप्रिल, 1948.

☛ 8 एप्रिल, 1948 श्री. श्यामाप्रसाद मुखर्जींनी पहिले औद्योगिक धोरण जाहीर केले.

1) सर्व लोकांना न्याय व समानेसाठी सामाजिक व्यवस्था.
2) जीवनमान उंचावणे.
3) साधणाचा पर्याप्त वापर, अधिक रोजगार.

**वैशिष्ट्ये :-**

मिश्र अर्थव्यवस्था व उद्योगाचे सहअस्तीत्व.
खाजगी क्षेत्राचे महत्त्व मान्य केले.
1951 मध्ये उद्योगांच्या संरक्षणासाठी 'उद्योग कायदा'.

## 2) 1956 चे दुसरे औद्योगिक धोरण :- (30 एप्रिल, 1956)

- 'समाजवादी समाजरचना' निर्माण करणे - काँग्रेसचे आवडी अधिवेशन - 1956.
- 1956 च्या धोरणात सार्वजनिक उद्योगाला महत्त्व खजगी उद्योगांचा संकोच.
- उद्योगाचे तीन अनुसूचित वर्गीकरण.
  - अनुसूची - अ - 17 उद्योग - शासकीय उद्योग - केंद्रिय शासनाचा अधिकार.
  - अनुसूची - ब - 12 उद्योग.
  - अनुसूची - क - इतर उद्योग व परवाना सक्तीचा.

  वरील अनुसूचित न मोडणारे उद्योग - परवाना सक्तीचे.

## 3) 1969 चे धोरण :-

- अनुसूची क - मधील उद्योगांना परवानगीसाठी. परवाना धोरण.
- 'औद्योगिक घराण्यांनाच' परवाने दिले जात होते. हा एकाधिकार मोडण्यासाठी 1969 चे धोरण जाहीर.
- 1969 - MRTP Act समंत.
- उद्योगाचा कायदा.
- आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण टाळणे / मक्तेदारी मांडणे.
- 100 कोटी पेक्षा मोठ्या उद्योगांना गुंतवणूक मान्यता घेणे बंधनकारक करण्यात आले.
- 1991 - मध्ये MRTP कायद्यात सुधारणा.
- 2002 मध्ये MRTP ऐवजी Competition - Act 2002 संमत करण्यात आला.
- 2007 मध्ये Competition Act मध्ये सुधारणा.
- 20 मे, 2009 ला CCI ची स्थापना. 'Competition Commission of India'.
- आयोगात एकुण 7 सदस्य.

## 4) 1969 चे औद्योगिक धोरण :

- अनुसूची क मधील उद्योगांच्या स्थापनेसाठी शासनाकडून परवाना घ्यावयाचा होता. विकासाच्या आणि आर्थिक नियोजनाच्या उद्देशाने 'परवाना धोरणाची' रचना करण्यात आली होती. पण असा परवाना देण्यात मोठे राजकारण खेळले जाऊ लागले. काही विशिष्ट 'औद्योगिक घराण्यांनाच' असा परवाना दिला जात असे.
  'खासगी क्षेत्राच्या अशा एकाधिकारशाहीला लगाम लावण्यासाठी' 1969 मध्ये औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले.
- यासाठी 1969 मध्ये MRTP (Monopolies & Restrictive Trade Practices Act) कायदा संमत करण्यात आला.

## 5) 1973 चे औद्योगिक धोरण :-

- 1973 मध्ये पुन्हा औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले. लोह, पोलाद, सिमेंट, कोळसा, कच्चे तेल, ऊर्जा इत्यादी क्षेत्रातील उद्योगांना नवीन 'मुलभूत उद्योग' अशी संकल्पना वापरली जाऊ लागली.
- शासकीय तसेच खासगी क्षेत्रांच्या एकत्रित गुंतवणुकीस - संयुक्त क्षेत्र (Joint Sector) स्थापन करण्यास परवानगी देण्यात आली.
- परकीय चलनाच्या नियमानासाठी FERA (Foreign Exchange Regulation Act) (कायदा) संमत करण्यात आला.
- परकीय गुंतवणुकीस (विशिष्ट नियमावलीत) परवानगी देण्यात आली.

## 6) 1977 चे औद्योगिक धोरण :-

- जनता दल राजवटीत हे धोरण जाहीर करण्यात आले. अनावश्यक क्षेत्रांमध्ये परकीय गुंतवणुकीवर निर्बंध घालण्यात आले.
- औद्योगिकरणाच्या विकेंद्रीकरणावर अधिक भर देण्यात आला. लघु आणि कुटीर उद्योगांना विशेष महत्त्व देण्यात आले. यासाठी 'जिल्हा उद्योग केंद्राची' (DIC - District Industrial Centres) स्थापना करण्यात आली.

## 7) औद्योगिक धोरणे 1980, 1985, 1986 :-

- 1980 मध्ये काँग्रेस सरकार पुन्हा सत्तेत आल्यावर 1980 चे औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले. जिल्हा उद्योग केंद्र चालु ठेवण्यात आली. परकीय गुंतवणुकीस मात्र पुन्हा मान्यता देण्यात आली.
- वरील धोरणांना अनुसरुन 1985 व 1986 मध्ये सुधारणा करुन औद्योगिक धोरणे जाहीर करण्यात आली.

## 8) नवीन औद्योगिक धोरण 1991 :-

- 24 जुलै, 1991 ला नवीन औद्योगिक धोरण (New Industrial Policy) जाहीर करण्यात आले. 1991 चे नवीन औद्योगिक धोरण म्हणजे उदारीकरणातले सर्वात मोठे पाऊल होय.
- नवीन औद्योगिक धोरणाची खालील उद्दिष्ट्ये होती.
  - i. उत्पादन क्षेत्रात शाश्वत वाढ घडवून आणणे.
  - ii. उत्पादक रोजगारनिर्मिती करणे.
  - iii. मानवी संसाधनांचा पुरेपूर वापर करणे.
  - iv. भारतीय उद्योगांना जागतिकीकरणाच्या स्पर्धेत टिकता यावे यासाठी त्यांच्यात स्पर्धात्मकता वाढविणे.
  - v. जागतिक स्पर्धेत भारताला प्रमुख भागीदार व योजक बनविणे.
- नवीन औद्योगिक धोरणान्वये उद्योग क्षेत्रात खालील बदल करण्यात आले.

## औद्योगिक परवाना धोरणाचे उदारीकरण :-

i. विशिष्ट 18 उद्योग सोडून इतर सर्व उद्योग परवानामुक्त करण्यात आले. यापैकी देखील 1993 मध्ये 3, 1996 मध्ये 1, 1997 मध्ये 5, 1998 मध्ये 3, 2000 मध्ये 1 उद्योग परवानामुक्त करण्यात आले.

ii. सध्या 5 उद्योग असे आहेत ज्यासाठी परवाना घ्यावा लागतो हे पाच उद्योग - आरोग्य, नियोजन व सुरक्षिततेशी संबंधित आहेत. हे पाच उद्योग :-
   1. दारु - मादक द्रव्यांचे कारखाने.
   2. तंबाखूपासून तयार होणाऱ्या विडी, सिगारेट बनविणारे उद्योग.
   3. संरक्षण साधने बनविणारे उद्योग.
   4. आगकाड्या व इतर ज्वलनशील उद्योग.
   5. घातक रसायने.

## महारत्न : एकुण 8

1. Bharat Heavy Electricals Ltd - BHEL.
2. Coal India Ltd - CIL
3. Gas Authority of India Ltd - GAIL
4. Indian Oil Corporation Ltd - IOCL
5. National Thermal Power Corporation Ltd - NTPC
6. Oil & Natural Gas Corporation Ltd - ONGC
7. Steel Authority of India Ltd - SAIL
8. Bhart Petroleum Corporation Ltd- BPCL - 8 सप्टेंबर, 2017 रोजी महारत्नाचा दर्जा.
9. Power Gride Corporation of India Ltd., - PGCIL
10. Hindustan Petroleum Corporation Ltd., - HPCL
11. Power Finance Corporation Ltd.,-PFCL
12. Rural Electrification Corp.Ltd.-RECL

### आठवे महारत्न उद्योग - BPCL,

राज्य सरकारच्या मालकीचे आहे. यापूर्वी नवरत्नमध्ये समाविष्ट होते. आंतरराष्ट्रीय उद्योगामध्ये भागीदारी आहे. भारतातील उद्योगातील दिग्गज म्हणून भारत सरकारने महारत्नात BPCL चा समावेश केला.

### महारत्न दर्जा मिळण्याच्या अटी :-

1. सुरुवातीस नवरत्न दर्जा असला पाहिले,
2. सेबी निकषानुसार सर्व भागीदारी व शेअर बाजारात नोंदणी असावी.
3. मागील तीन वर्षे एकुण उत्पन्न (Turn over) 25 हजार कोटी असावा.
4. मागील तीन वर्षात निव्वळ नफा 15 हजार कोटी असावा.
5. मागील तीन वर्षात सरासरी कर वजा जाता निव्वळ उत्पन्न 5 हजार कोटी असावे.
6. आंतरराष्ट्रीय व्यापारात विशेष भागीदारी पार पाडणारा उद्योग असावा.

### नवरत्नाच्या अटी / नवरत्नाचे निकष :-

1. मिनीरत्न दर्जा एक असावा.,
2. तीन वर्षात सर्वोत्तम दर्जा असावा.
3. सहा घटक निकष 60% गुण असावेत.,
4. निव्वळ नफ्यास 25% गुण असावेत.

### मिनिरत्न अटी :-

1. तीन वर्ष सतत नफा असावा.
2. तीन वर्षातील 1 वर्षे वजा जाता 30 कोटी रुपये निव्वळ उत्पन्न असावे.
3. तो उद्योग सतत नफ्यात असावा व नफा धनात्मक असावा.

**नवरत्न : एकुण 17.** **मिनीरत्न I : एकुण 56.**

**मिनिरत्न II : एकुण 17.**

## MSME उद्योगाच्या व्याख्या

### आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत बदल

- MSME 2020 मध्ये सुधारणा
- उद्योग व सेवा क्षेत्रासाठी समान निकष
- आधार- गुंतवणुक व वार्षिक उलाढालीची मर्यादा.

| पुर्वीचे निकष | सुक्ष्म | लघु | मध्यम | मोठे उद्योग |
|---|---|---|---|---|
| उत्पादन - | २५लाख | ५ कोटी | १० कोटी | १० कोटी पेक्षा जास्त |
| सेवाक्षेत्र - | १० लाख | २ कोटी | ५ कोटी | |

| सध्याचे निकष | सुक्ष्म | लघु | मध्यम | मोठे उद्योग |
|---|---|---|---|---|
| उद्योग - उत्पादन क्षेत्र | १ कोटी | ५ते १०कोटी | १० कोटी | १० कोटी पेक्षा जास्त |
| सेवाक्षेत्र - | १ते५ कोटी | ५ते१० कोटी | १०ते २०कोटी | २०कोटी पेक्षा जास्त |